नि. दि. दा. क्र. ६२/२०१९
भारतअप्पा व ई वि. सरकार
व ईतर.

<u>नि. क्र.१५ वरील आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१ वरील आदेश रद्द करुन लेखी जवाब व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मागितली.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे म्हणणे आहे की, सदरच्या दाव्याच्या समन्सची बजावणी दि. १४/०२/२०१९ रोजी झाली होती. त्यानंतर वेळोवेळी लेखी जवाब दाखल करणेकामी वेळ मागून घेतला. परंतू मुदतीत लेखी जवाब दाखल केला नाही म्हणून प्रतिवादी क्र.२ व ३ विरुध्द दिनांक २६.०६.२०१९ रोजी विनाकैफियत दावा चालविण्याचे आदेश पारीत करण्यात आले.

३. प्रतिवादी क्र.२ व ३ चे पूढे म्हणणे आहे की, वादीने प्रस्तूतचा दावा आज्ञात्मक हुकूत व घोषणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ याच्या म्हणण्यानूसार जरी त्याला समन्सची बजावणी झाली होती, परंतू संबंधीत कार्यालयाचे अधिकारी हे रजेवर असल्यामुळे त्यांचे कडुन दाव्यातील परिच्छेद निहाय अहवाल व संबंधीत महत्वाचे कागदपत्रे संबंधित दाव्याबाबत त्याला हस्तगत करायचे असल्याने प्रतिवादी क्र.२ व ३ हा त्याच्या विधिज्ञांशी वेळेत संपर्क साधू शकला नाही. म्हणून प्रतिवादी क्र.२ व ३ हा वेळेत त्याचा जवाब दाखल करु शकला नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ चे पूढे असे म्हणणे आहे की, विलंब माफ करुन नि. क्र.१ वरील आदेश रद्द करण्याचा व कैफियत रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज मंजूर करावा.

४.	सदर अर्जावर वादीने म्हणणे दिलेले असून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. अर्जातील कारण नमूद केलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ ने कोणतेही कागदपत्र रेकॉर्डवर दाखल केलेले नाहीत यावरुन दिसून येते की, प्रकरण वाढविण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र.२ व ३ ने अर्जात दिलेले कारण संयुक्तिक नसल्यामूळे अर्ज रद्द करण्यात यावा.

५.	दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.२ व ३ ने कथन केल्यानुसार तो त्याच्या विधिज्ञांशी संपर्क करु शकला नाही व वेळेत त्याचे म्हणणे दाखल करु शकला नाही.

६.	दिवाणी प्रक्रिया संहिता मधील दुरुस्ती सन २००२ ही दाव्याचे कामकाज सुरळीत व लवकरात लवकर पूढे व्हावे म्हणून करण्यात आलेली तरतूद ही प्रतिवादी यांनी समन्स प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत त्यांची कैफियत व म्हणणे देणे गरजेचे आहे. तसे संयुक्तीक कारणासह दिलेला अर्ज हा यथायोग्य वाटल्यास सदरचा कालावधी हा ९० दिवसापर्यंत वाढविण्यात येईल अशी तरतूद दिलेली आहे. त्यामूळे प्रतिवादी यांनी ९० दिवसानंतर दाव्यात कैफियत देता येणार नाही असा आदेश झाल्यास प्रतिवादीवर त्याचा बचाव मांडण्याची संधी नाकारणेसारखे होईल व त्यास नैसर्गिक न्यायतत्वाची बाधा निर्माण होत असल्याने जरी वादीस सदरचा दावा चालविण्यास विलंब झाला तरी दाव्याचे स्वरुप हे घोषणा व मालकीसाठी असुन दावामिळकत ही जुन्या काळातील चांदीची १२७७ नानी वादीस मिळावी अशी मागणी असल्यामुळे महाराष्ट्र शासनास त्याबाबत पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. जेणे करुन दोन्ही पक्षांचे आरोप व बचाव रेकॉर्डवर येवुन गुणवत्तेवर दावा निकाली काढता येईल. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना सदरच्या दाव्यात उशीरा माफी मंजूर करण्यात येवुन निशाणी क्र.१ वरील आदेश रद्द

करण्यात येतो व अर्ज मंजूर करण्यात येते. तेव्हा पूढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. प्रतिवादी क्र.२ व ३ याचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

स्वा/-

दिनांक ०८/०८/२०१९

(श्रीमती एम. वाय. डोईफोडे)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व स्तर,
जालना.